आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in




दैनिक

# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक २९४ वा ● मंगळवार दि. २९ एप्रिल २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## झरोका

एक – भाजपाचे अध्यक्ष जे पी नड्डा यांनी पहलगाम हल्ला प्रकरणी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना प्रत्युत्तरासाठी दहशतवाद बिमोड करण्यासाठी शक्ती द्यावी असे साकडे, दगडूशेठ हलवाई गणपतीला घातले आहे म्हणे, हे काय गौडबंगाल बंगाल आहे, हेच कळत नाही. डोके बधिर झालंय.

दुसरा – अरे, अय्योध्येतील राम मंदिरातील रामाने मोदींना सहकार्य करण्यास नकार दिल्याने, भाजपाच्या जे पी नड्डा यांनी दगडूशेठ हलवाई गणपती कडे मोर्चा वळविला. मोदी हुजरेगिरी सिद्ध करण्यासाठी दुसरा मार्ग कोणता तरी असला पाहिजे म्हणून ते साकडे असेल, पण तू कशाला चिंता करतोस.

एक – अहो, विघ्नहर्ता म्हणून गणपती बप्पाकडे पाहिले जाते, ही बाब वेगळी पण पाकला धडा शिकविण्यासाठी लष्कर असताना गणपती बप्पांना नड्डाचे साकडे कसे काय म्हणून विचारतोय तर तुम्ही रामाला मध्ये आणले, काहीच कळत नाही.

दुसरा – अरे, प्रधानमंत्री नरेंद्र मोदींना शक्ती द्या असे आदेश लष्कर प्रमुखांना जे पी नड्डा देऊच शकत नाहीत पण लांगूनचालन आणि मोदीनिष्ठा सिद्ध होते, म्हणून हा नड्डा याचा पांचटपणा असावा, समजलं.

एक – अहो, पहलगाम हल्ला प्रकरण म्हणजे भारत विरोधी कारवाई म्हणावी लागेल, त्यासाठी पाकला धडा शिकवलाच पाहिजे ही आत्मिक भावना असेल म्हणून नड्डा ने दगडूशेठ हलवाई गणपती कडे आराधना केली असेल, त्यात चूक काय ?

दुसरा – अरे, निर्जीव मूर्ती काहीच करू शकत नाही, त्यासाठी लष्कर सज्ज आहे, त्यासाठी देवाला साकडे कशाला, ही तर नड्डाची लाचारीच आहे, लाचारी करा पण ते पत्रकारांना कशाला सांगता, प्रसिद्धी कशाला घेता, हेच मूळ कारण आहे. या नड्डाला पहलगाम हल्ल्याचे काय देणे, घेणे ?

## काय बोलता राव ?

ठाकरे शिवसेना आणि राज ठाकरेंची मनसेना एकजुटीचा बोलबाला झाला. काही दिवस करमणूक झाले, राज ठाकरे यांनी सेना, मनसेंना एकत्रित करण्याला विरोध केला नाही. उद्धव ठाकरे यांनी नकार न देता अटीवर भर दिला तर राज ठाकरे यांनी महाराष्ट्रातील तमाम मराठी तरुणाने मराठा तरुणांनी नवे एकत्र येऊन नवीन पक्ष स्थापन करावा असे सुचित केले, आणि गुंतागुंत वाढले असे प्रचार माध्यमातून टाळ उडली, मग सारे वादळ शांत झाले.

### काय बोलता राव !

अरे, मुळातली बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना फुटली, उद्धव ठाकरे शिवसेनेचे प्रमुख बनले आणि त्यातून उद्धव चे नेतृत्व नको म्हणून राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना काढली. दोघेही आपापल्या परीने सत्ता, संघर्ष करते बनले. पण त्यांच्या गुंतागुंताचे रहस्य उलगडले कारण यात कसली गुंतागुंत म्हणून आम्ही काय वर्षपूर्वी महाराष्ट्राच्या व्यापक हितासाठी वेगळे झालो होतो पण आता मात्र राज्याच्या व्यापक हितासाठी आम्ही एकत्र येण्याचा विचार करीत आहोत, त्यात काय बिघडले. कारण महाराष्ट्र आमचा, आम्ही महाराष्ट्राचे, मराठा नसलो म्हणजे काय झाले. मराठी बोलतो, शिकलो आहोत, अशा त्यांचा कांगाव आहे. मग बोला दाजीबा!




## हेरिटेज दर्जा कायम ठेवून बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या ऑडिटोरियमचा पुनर्विकास करावा – उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई : – पुण्यातील बी. जे.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय हे स्वातंत्र्यापूर्वीपासूनचे राज्यातील नामवंत असे शासकीय महाविद्यालय आणि रुग्णालय आहे. त्यामुळे येथील ऑडिटोरियमचा पुनर्विकास करताना त्याचा हेरिटेज दर्जा कायम राखून तो महाविद्यालयाच्या लौकिकास साजेसा व्हावा. त्यासाठी तातडीने एकात्मिक विकास आराखडा सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी दिले.



पुणे येथील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या ऑडिटोरियमच्या पुनर्विकासाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या मंत्रालयातील समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, बी जे वैद्यकीय महाविद्यालयात अनेक विद्यार्थी वैद्यकीय पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिक्षण घेत आहेत. येथील महात्मा गांधी सभागृहामध्ये (ऑडिटोरियम) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे विविध सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रम तसेच राज्यस्तरीय कार्यक्रम घेण्यात येतात. परंतु सद्यस्थितीत या कार्यक्रमांसाठी महात्मा गांधी सभागृहाची आसन क्षमता अपुरी पडत आहे. या सभागृहात ५०० विद्यार्थ्यांची आसनक्षमता आहे. तथापि या ठिकाणी सुमारे १,५०० विद्यार्थी शिकत आहेत. त्यामुळे या सभागृहाचा पुनर्विकास करून पंधराशे आसन क्षमतेचे सुसज्ज सभागृह निर्माण करण्यात यावे.

यावेळी हेरिटेज वास्तू विशारद आभा लांबा यांनी ऑडिटोरियमच्या पुनविकासाबाबत सादरीकरण केले.

एक हजार विद्यार्थी क्षमतेच्या नवीन पदव्युत्तर वसतिगृहाच्या निर्मितीस तत्वतः मान्यतावैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरातच एक हजार विद्यार्थी क्षमतेचे पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठीचे वसतिगृह बांधण्यासही या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय होणार आहे.

या बैठकीस नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव राजेश देशमुख, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरजकुमार, वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक डॉ.अजय चंदनवाले, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार, पुणे येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण उपस्थित होते तर पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी हे दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

## पुसद येथे 'महानायक बिरसा' या महानाट्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

यवतमाळ,(जिमाका): एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पुसदच्यावतीने स्व. सुधाकरराव नाईक प्रेक्षागृह, बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय, पुसद येथे 'महानायक बिरसा' या महानाट्याचा प्रयोग पार पडला. आदिवासी विकास राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रयोगास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



प्रकल्प कार्यालयाच्यावतीने कला वैभव नाट्य व सांस्कृतिक संस्था यवतमाळ द्वारे निर्मित या प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून आदिवासी विकास, मृदा संधारण, सार्वजनिक बांधकाम पर्यटन उद्योग, उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री इंद्रनील नाईक उपस्थित होते. यावेळी प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर, समाज कल्याणचे सेवानिवृत्त उपायुक्त माधव वैद्य, बिरसा क्रांती दलाचे संस्थापक अध्यक्ष दशरथ मडावी व सुनील ढाले उपस्थित होते.

सर्वप्रथम महापुरुषांच्या प्रतिमा पुजन, दीपप्रज्वलन, माल्यार्पण करण्यात आले. तद्नंतर राज्यमंत्री नाईक यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर माहिती देवून आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले.

अमोल मेतकर यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जन्मोत्सव वर्ष जनजाती गौरव वर्ष म्हणून साजरा करण्यात येत आहे. याप्रमाणेच धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत आदिवासी बहुलक्षेत्र असलेल्या गाव, वस्ती, पाड्यावरील तसेच शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थी व लाभार्थ्यांना आवश्यक असलेल्या जातीचा दाखला, राशनकार्ड, आधिवास प्रमाणपत्र, आधारकार्ड इत्यादी दस्तऐवज मिळून देण्याकरीता विविध ठिकाणी शिबिर आयोजित करण्यात येत असल्याचे सांगितले.

'महानायक बिरसा' या महानाट्य कार्यक्रमास पुसद परिसरातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी नाट्यप्रयोग पाहून आनंद व्यक्त केला व उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अरुण चव्हाण यांनी कार्यक्रमाचे संचलन केले व आभार मानले.

# आमिषाला बळी न पडता माझ्या कार्यकर्त्यांनी अशक्य वाटणारा विजय सत्यात उतरविला

लातूर– लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात गेल्या वीस वर्षापासून संघर्ष करतोय, या संघर्षाला आजपर्यंत अनेकांनी साथ दिली विधानसभा निवडणूकीत एका बाजूला काँग्रेसचा पाऊस पडत असताना मनाने श्रीमंत असलेले माझे गरीब कार्यकर्ते लढत होते. काँग्रेसच्या आमिषाला बळी पडले नाहीत अशक्य वाटणारा विजय त्यांनी कष्टातून, मेहनतीतून सत्यात उतरविला याचा मला सार्थ अभिमान आहे माय माऊल्यांनी, मतदारांनी प्रचंड आशीर्वाद दिले, माझ्यावर विश्र्वास टाकला हे ऋण कदापी विसरू शकत नाही आमदारकीचा उपयोग मी स्वतःसाठी आजपर्यंत केला नाही आणि यापुढेही करणार नाही केवळ तुमचे आशीर्वाद प्रेम आणि साथ मला हवी आहे असे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे नवनिर्वाचित आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी केले.




लातूर ग्रामीण विधानसभा निवडणुकीत मतदारानी एकाधिकारशाही, हुकूमशाही आणि धनशक्ती विरुद्ध आवाज उठून भाजपा महायुतीचा ऐतिहासिक विजय केल्याच्या निमित्ताने मतदारांशी संवाद साधून जाहीर आभार व्यक्त करण्यासाठी लातूर तालुक्यातील मौजे भातांगळी येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेत आ. रमेशआप्पा कराड बोलत होते. याप्रसंगी शिवसेना (शिंदे गट) जिल्हा संपर्कप्रमुख अँड बळवंतराव जाधव, युवा नेते ऋषिकेशदादा कराड, भाजपा किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, महिंद्र गोडभरले, शरद दरेकर, पांडुरंग बालवाड, विजय मलवाडे, गोविंद नरहरे, आदिनाथ मुळे, सुरेखा पुरी मारुती शिंदे, राम बंडापल्ले, सुरेश पाटील, व्यंकट जटाळ, संजय ठाकूर, हनुमंत गव्हाणे, सतीश बिराजदार, लक्ष्मण नागिमे, रुपेश थोरमोठे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

या सभेत सरपंच संघटनेचे अध्यक्ष महादेव साळुंके यांच्यासह सलगरा, दगडवाडी, बोकनगाव, रमजानपूर येथील असंख्य कार्यकर्ते तसेच माजी सरपंच, चेअरमन व इतर लोकप्रतिनिधींनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. प्रारंभी भातांगळी ग्रामस्थांच्या वतीने वाजत गाजत ढोल ताशाच्या गजरात फटाक्यांची आतिषबाजी करत मोठ्या उत्साहाच्या वातावरणात आ. रमेशआप्पा कराड यांच्यासह मान्यवरांची भव्य मिरवणूक काढण्यात आली सभेला भाजपा व महायुतीचे कार्यकर्ते मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, आयुष्यभर संघर्ष करणारे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. शेतकऱ्याचे दुःख काय असते ते मी जवळून पाहिले आहे शेतकऱ्यांना कष्टाचा, घामाचा मोबदला मिळावा. गोरगरीब सर्वसामान्याच्या हितासाठी या मतदार संघात गेल्या वीस वर्षापासून संघर्ष करीत राहिलो. माझ्या या संघर्षाला बहुसंख्य कार्यकर्त्यांनी वेळोवेळी साथ दिली. विधानसभा निवडणुकीत गावागावांतील वाडी – वस्तीतील कार्यकर्त्यांनी जिवाचे रान करून, मेहनतीने, जिद्दीने निवडणूक जिंकली. अशक्य वाटणारा विजय सत्यात उतरविला. माय मावल्यांनी प्रचंड आशीर्वाद दिला हे उपकार कधीही फेडू शकत नाही. असे सांगून मतदारासह सर्व सहकार्याचे अंतकरणापासून ऋण व्यक्त केले.

गेल्यावेळी भ्रष्ट पैशातून मतदारसंघ विकत घेण्याचे पाप काँग्रेसवाल्यांनी केले मात्र देशात सर्वाधिक विक्रमी नोटाला मतदान झाले याची दखल घेऊन पक्षाने मला आमदार केले या आमदारकीचा उपयोग ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी केला. साडेतीन चार वर्षात मतदारसंघात तेराशे कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असंख्य मंदिराची जीर्णोद्धार करण्याचे भाग्य लाभले मात्र पंधरा वर्षात काँग्रेस आमदारांनी काय केले असा प्रश्र्न उपस्थित करू सर्वसामान्यांना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आडवा आणि जिरवा हीच काँग्रेसची भूमिका होती असे सांगून कारखान्यावर शेतकऱ्यांचा अधिकार असला पाहिजे त्यांच्या कष्टाचा योग्य तो मोबदला मिळाला पाहिजे यासाठी या पुढील काळात संघर्ष करणार असून आपण सर्वांनी साथ द्यावी असे आ. कराड यांनी बोलून दाखविले. गेल्या पंधरा वर्षात काँग्रेसच्या काळात जे मिळाले नाही ते पाच वर्षात देण्याचा माझा प्रयत्न राहील अशी ग्वाही दिली. माझ्या डोळ्याची शस्त्रक्रिया झाल्याने आजारी होतो याबाबत देशमुखाची प्रामाणिकपणे चाकरी करणाऱ्यांनी नाही नाही ते उठवले, पोटनिवडणूक लागणार असे बोलले, उलट सुलट चर्चा केली, मात्र जोपर्यंत गोरगरीब जनतेचा आशीर्वाद माझ्या पाठीशी आहे तोपर्यंत काहीही होणार नाही असे सांगून भातांगळी गावासह परिसरातील विकासाला निधीची अडचण भासू देणार नाही येणाऱ्या हनुमान जयंती पर्यंत डोमचा सभा मंडप पूर्ण करून देणार असेही आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

यावेळी बोलताना शिवसेना संपर्कप्रमुख अँड. बळवंतराव जाधव म्हणाले की, निवडणुकीनंतर आभार मानून विकास कामे सांगा असे म्हणणारे एकमेव आमदार रमेशआप्पा आहेत आजपर्यंत काँग्रेसवाल्यांनी केवळ स्वतःच्या परिवारासाठी राजकारण केले आजही सर्व कारखान्याचे चेअरमन देशमुखच केले या कारखान्यावर अंकुश ठेवण्याचे काम रमेशआप्पांनी करावे असे सांगून काँग्रेसच्या घराणेशाही राजकारणाला छेद देण्याचे काम रमेशआप्पा कराड यांनी केले असून आपले गाव सुधारले पाहिजे विकसित झाले पाहिजे या भूमिकेतून आणि मतदार बंधू भगिनींनीच्या विश्र्वासाला पात्र राहून काम करण्याची जबाबदारी आता कार्यकर्त्यांची आहे. युवा नेते ऋषिकेशदादा कराड यावेळी बोलताना म्हणाले लातूर ग्रामीण मधून भाजपचा आमदार होणार हे शक्य वाटत नव्हते मात्र रमेशआप्पांची नाळ सर्वसामान्य सोबत जोडली असल्याने मतदारांनीच यावेळी आप्पांना आमदार करण्याचा निर्णय घेतला होता मतदारांनी प्रचंड आशीर्वाद दिले माझ्या कातडीची जोडे करून मतदारांच्या पायात घातले तरी त्यांनी कराड परिवारावर दाखवलेल्या विश्र्वासाचा उपकार फिटणार नाहीत असे सांगून या कर्मभूमीचा जन्मभूमीचा मी काहीतरी देणे लागतो या भावनेतून रमेशआप्पा काम करीत आहेत जोपर्यंत मतदार संघातील प्रत्येक गाव विकसित होणार नाही तोपर्यंत म्हणजे येणारे पंधरा वर्ष रमेशआप्पा आमदार कायम रहावेत या भूमिकेतून आपण सर्वजण काम करू या अधिका अधिक निधी खेचून आणू या असे बोलून दाखवले. या सभेत प्रताप पाटील, पांडुरंग बालवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी व्यंकट जटाळ यांनी प्रास्ताविक केले तर शेवटी आदिनाथ मुळे यांनी आभार मानले. सभेचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले.

यावेळी राम बंडापल्ले, लिंबराज बोळंगे, चंद्रकांत पासमे, सचिन साबदे, रुपेश काळे, अशोक बिराजदार, लक्ष्मण मुळे, पुंडलिक बेंबडे, संजय सावंत, यादवराव पाटील, अहमद शेख, संजय मुर्गे, कमलाकर बाचपले, बालाजी पांचाळ, संजय सावंत, सोमनाथ वाघमारे, दिलीप मुक्ता, दुष्यंत शिंदे, अक्षय पाटील, विशाल पाटील, गणेश बोबडे, हनुमंत भोसले, सुभाष भोळे, भागवत गावित, पांडुरंग शिंदे, धनंजय शिंदे, आत्माराम यादव, विष्णू कारवाडे, बालाजी सुरवसे, बाबासाहेब इंगळे, संभाजी वाकडे, पद्माकर शिंदे यांच्यासह भाजपा महायुतीचे कार्यकर्ते पदाधिकारी मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in

## मुंबई ईडी कार्यालयाला आग! आगीत महत्त्वाचे पुरावे नष्ट; चोक्सी, नीरव मोदी, भुजबळ प्रकरणांच्या फाईल जळून खाक?

मुंबई –कैक महत्त्वाच्या प्रकरणांचे पुरावे असणाऱ्या आणि आतापर्यंत अनेक मोठ्या प्रकरणांच्या चौकशीसत्रांसाठीच्या महत्त्वाच्या स्थळांपैकी एक असणाऱ्या ईडी कार्यालयासंदर्भातील मोठी माहिती समोर आली आहे. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्राचं राजकारण ईडी चौकशीच्या तपासाभोवती फिरतंय. अशातच रविवारी पहाटे मुंबईत ईडीच्या ऑफिसला आग लागली. या आगीत मोठं नुकसान झालंय. मात्र या आगीत महत्त्वाच्या फाईल्स जळाल्याची शक्यता आहे. मेहूल चोक्सी, नीरव मोदी, छगन भुजबळ प्रकरणासह महत्त्वाच्या फाईलचा समावेश असल्याची चर्चा आहे. या आगीमुळे ईडीच्या तपासात अडखळा येण्याची शक्यता आहे.

रविवारी रात्री लागलेल्या आगीत ईडी ऑफिसच्या चौथ्या मजल्यावर असलेल्या मालमत्तेचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. यामध्ये काही महत्त्वाच्या फाईल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणं जळाल्याचंही बोललं जात आहे. ईडीने अद्याप याबाबत कुठलीही अधिकृत माहिती किंवा तक्रार पोलिसात दाखल केली नसल्याचे देखील माहिती समोर आली आहे.

दहा तास अग्नितांडव मुंबईतील अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) कार्यालयात रविवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास लागलेल्या आगीत मेहुल चोक्सी, नीरव मोदी आणि छगन भुजबळ यांच्या प्रकरणांशी संबंधित महत्त्वाच्या फाईल आगीत जळून खाक झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही आग सुमारे १० तासांनंतर रात्री ९ वाजता आग आटोक्यात आली. आग विझवण्यासाठी मुंबई अग्निशमन दलाच्या १० गाड्या आणि १०० कर्मचाऱ्यांनी अथक प्रयत्न केल्याचे सांगितले जाते. सदर प्रकरणात विशेष चौकशी सुरू असून, नेमक्या कोणत्या फाईल जळाल्या याची माहिती समोर आली नसून, ईडीने अनेक कारवाया आणि चौकशांचे डिडिटलायजेशन केल्याने मोठे नुकसान झाले नसल्याची शक्यतासुद्धा व्यक्त केली जात आहे. मात्र ज्या चौकशांचे डिजिटलायजेशन झाले नाही त्या पुराव्यांचे काय? हाच प्रश्न इथे उपस्थित केला जात आहे.

आगीमुळे तपासात येणार अडथळा? दरम्यान, ईडीच्या मुंबई कार्यालयात लागलेल्या आगीमुळे चौथ्या मजल्यावरील कार्यालयाचं मोठे नुकसान झालं असं सांगण्यात येत आले. इथं मेहुल चोक्सी आणि नीरव मोदी यांच्यावरील पंजाब नॅशनल बँक (पीएनबी) गैरव्यवहार प्रकरण (१४००० कोटी रुपये) आणि छगन भुजबळ यांच्यावरील महाराष्ट्र सदन घोटाळा तसेच मनी लाँडरिंग प्रकरणांच्या फायली याच कार्यालयात होत्या. आगीचे कारण अद्याप अस्पष्ट असून, शॉर्ट सर्किटची शक्यता वर्तवली जात आहे. आगीमुळ झालेल्या नुकसानामुळे तपासात अडथळा येण्याची शक्यता आहे,

# संताप नको हाबाडा हवा !

## संपादकीय...

भारताचे खंबीर कणखर नेतृत्व म्हणून भाजपा कार्यकर्ते, नेते, मंत्री गण नेहमीच गुणगान करून भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना विश्र्वगुरू संबोधित असतात. उरी, पुलवामा हल्ला प्रकरणी मोदीजीनी लष्कराच्या जीवावर यश प्राप्त केले. काश्मीरचा विशेष अधिकार रद्द करून त्याप्रकरणी एकही रक्ताचा थेंब सांडला गेला नाही. म्हणून भुसारकी मारली पण त्याच काश्मीरमध्ये घुसून पाकिस्तानी सैनिकाने पर्यटकांच्या हत्या केल्या, भारत सरकार बेसावद असतानाच पाकिस्तानने डाव साधला हे भारतासाठी तर चिंतनीय आहे. पण मोदी सरकारला एक प्रकारे आव्हान देणारी अशीच ठरली. त्यामुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मन की बात, मधून केवळ संताप व्यक्त न करता तत्कालीन दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याप्रमाणे जोर का झटका अर्थात दोन तुकडे केले त्याच प्रमाणे मोदीजीनी जोराचा हाबाडा देऊन पाकची जिरविली पाहिजे अशीच लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे. त्यासाठी लष्कराच्या गनिमी काव्यातून तसे घडवावे आणि घडीवितील असे म्हटल्यास वावगे ठरु नये असे वाटते.

पहलगाम हल्ला प्रकरणी भारत सरकार ठोस पावले उचलला आहे. लष्कर प्रमुखास प्रधानमंत्री म्हणून मोदीजी दक्ष दक्षतापूर्वक पाक विरोधी भूमिका वटवतील, आहेत. पण अशावेळी भारताच्या विकासाबद्दल, आर्थिक स्थिती, सरकारची कामगिरी, विरोधकाची निष्क्रियता वगैरे बाबी बाजूला ठेवून, पाक कसा बरबाद होईल यासाठी कार्यरत राहणे तिन्ही लष्कर दलाला स्वातंत्र्य देऊन प्रोत्साहित करणे ही काळाची गरज असून कायमस्वरूपी पाकची वळवळ बंद करण्यासाठी संताप नव्हे तर चूक प्रतिउत्तरातून, हल्ल्यातून हाबाडायूक्त लष्करी कारवाई करणे गरजेचे वाटते.

भारताचे मित्रपक्ष असलेले अमेरिकेस इतर देशांची पाठबळ विरोधी चीन आणि पाकिस्तानची भूमिका वगैरेचा आत्मशुद्धी अंदाज लावूनच तशी कानखोर, कठोर भूमिका घेऊनच भारतीय लष्कराने मोदी सरकारने पाक विरोधी लष्करी कारवाई करून पाकला धडा शिकविला पाहिजे, अशीही राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया उमटताना दिसते आहे ती दुर्लक्ष करून चालणार नाही. असा सूर प्रसार माध्यमातून उमटताना दिसतो आहे. अशा क्रिया, प्रक्रिया प्रतिक्रियातून शोध आणि बोध घेऊनच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पाक सरकारला पाकी लष्कराला धडा शिकविला पाहिजे, अशीच सर्वसामान्य जनतेतून भावना प्रकट होताना दिसते आहे.

आंतरराष्ट्रीय परस्पर संबंधित धोरण आबाधीत ठेवूनच शत्रूंना पराभूत करणे त्यांची जगाच्या वेशीवर बेईज्ञतीचे लक्तरे टांगणे एक घाव दोन तुकडे करून पाक व्याप्त कश्मीरही हिसकावून घेणे आणि पहलगाम हल्ल्याचा बदला घेणे हेच एकमेव ध्येय, धोरण समोर ठेवूनच लष्कराच्या स्वंयभू ताकदीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पाकला, पाक सरकारवर, पाकी लष्करावर संताप व्यक्त न करता जबरदस्त हल्ला करून कायमस्वरूपाचाच हाबडा द्यावा हेच उचित ठरावी अशी लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे. ती अनाठाई नसावी.

# मानव कल्याणासाठी बसवेश्र्वर महाराजांच्या कार्याचे अनुकरण आवश्यक.

बसवेश्र्वर महाराजांना कोणत्याही प्रकारचा लोभ नसल्यामुळे न्याय प्रीय राजा होते.बसवेश्र्वर महाराज हे बसव,बसवण्णा इत्यादी नावाने ओळखले जात असले तरीही थोर समाजसुधारक म्हणून त्यांची मोठी ख्याती होती.त्यामुळे त्यांचे कार्य आजही तेवढेच महत्त्वाचे व गरजेचे आहे.इ.स.११०५ ते ११६५या कालखंडात होऊन गेलेले कर्नाटकातील संत व समाजसुधारक होते.त्यांनी नेहमी निर्गुण व निराकार एकेश्र्वरवाद श्रध्देचा पुरस्कार केला. कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्र्वर–बागेवाडी या गावात ११०५ साली वीरशैव कुटुंबात बसवेश्र्वर महाराजांचा जन्म झाला. मुख्यत्वेकरून त्यांचा जन्म अक्षतृतीयेला झाला.अक्षतृतीया हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक व महत्वाचा दिवस मानल्या जातो. त्यामुळे या दिवसाला शुभ मानण्यात येते. बसवेश्र्वर महाराज कर्मठ विधीचा विरोध करायचे अशा परिस्थितीत मुंजीचा विरोध करून मला आधीच लिंगदीक्षा मिळाली आहे असे सांगत वयाच्या ८ व्या वर्षी घर सोडून ते कूडलसंगम येथे निघून गेले.कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे मोठे अध्ययन केंद्र होते.तेथे बसवेश्र्वरांनी १२ वर्षे वास्तव्य केले.कुडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा,धर्म, तत्वज्ञान इत्यादींचा प्रगल्भ अभ्यास केला.त्यांचा विवाह मामाच्या मुलीशी झाला व त्यानंतर सोलापूरातील मंगळवेढा येथे आले. बसवेश्र्वरांनी मंगळवेढा येथे लोकशाही संसद स्थापन केली.या संसद मंडपात सर्व धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक अडचणींवर कशी मात करायची यावर चर्चा करून व योग्य निर्णय घेवून पुढील कार्य होत असे. बसवेश्र्वर यांचे एकच उद्दिष्ट होते ते म्हणजे समाजातील वाईट चालीरितीचा विरोध करून समाजाच्या हिताच्या गोष्टींची अंमलबजावणी करण्याकडे जास्त महत्त्व देत असे.१२ व्या शतकातील आदर्श,समतेचे, जनकल्याणाकारी प्रणेते म्हणून बसवेश्र्वर महाराज ओळखले जायचे.त्यामुळेच १२ व्या शतकापासून खऱ्या अर्थाने लोकशाहीला सुरूवात झाल्याचे सांगण्यात येते.कारण लोकशाहीमध्ये समता,मुल्य, न्याय, बंधूंता,एकात्मता, संपूर्ण स्वतंत्र, अधिकार,नियम, नियंत्रण, शिस्त,सूशासन व योग्य प्रशासन यामुळे समाज व देश घडण्यास मोठी मदत मिळते. बसवेश्र्वर महाराजांच्या संसदेत जातीभेला बीलकुलच थारा नव्हता.त्यामुळे त्यांना समाजाला एकत्र बांधण्यास मोठी मदत मिळाली.कारण कोणत्याही प्रकारचा भेदभाव ते कदापि सहन करत नसे.आपल्याला २१ व्या शतकात जे कायदे दिसतात त्यात बसवेश्र्वर महाराजांचा सिंहांचा वाटा आहे.बसवेश्र्वर महाराजांना साक्षात नंदीचा अवतार मानल्या जाते.आपण ज्याला शंकरजीच वाहन म्हणतो.भगवान शंभर या पृथ्वीचा,मानव, पशुपक्षी व जीवजंतू यांचा पालनहार आहे. त्यांच्या सोबत नंदी म्हणजे साक्षात परमेश्र्वर बसवेश्र्वर महाराज म्हणजे ही दैवी लीलाच म्हणावी लागेल.कृष्णा आणि मलापहारी नद्यांच्या संगमावर असलेल्या गुरूकुलात ज्ञानी गुरूजनांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शिक्षण घेतले.विविध ग्रंथांचा, ज्ञानाच्या सर्व शाखांचा अभ्यास केला. त्यामुळेच त्यांनी संस्कृत ग्रंथातील धर्मतत्वे कन्नडमधुन लिहिली.बसवेश्र्वर महाराजांनी नेहमी आध्यात्मिक जीवन व समाज घडवीण्याच्या चालीरीतीचे मार्गदर्शन नेहमीच करीत असे.कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्रात आपल्याला लोकांच्या जिभेवर आजही बसवेश्र्वरांची वचने आरूढ झाल्याचे दिसून येते.सत्ता वैभव आणि कीर्ती याला यत्किंचितही वाव न देता आध्यात्मिक व नितिमुल्याला प्रथम प्राधान्य देवून समाज हितासाठी अहोरात्र प्रयत्न केले. बसवेश्र्वरांच्या काळात समाजव्यवस्थेत स्त्रीयांना शुद्र, बहिष्कृत समजले जायचे. त्यांना स्त्रीयांवर होत असलेला अत्याचार सहन झाला नाही. याकरीता त्यांनी या विरूद्ध मोठा लढा उभारून मोठे भरीव कार्य केल्याचे दिसून येते.तत्कालीन समाजव्यवस्थेला व राजसत्तेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह महात्मा बसवेश्र्वरांच्या पुढाकाराने १२ व्या शतकात घडला.त्यामुळे बसवेश्र्वर महाराजांचे प्रत्येक कार्य व त्यांची जीवनशैली आज समाजाला प्रेरणादायी ठरू शकते व ठरत आहे.आज देशातील राजकीय पुढाऱ्यांनी बसवेश्र्वर महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन समाज हितांचे व देश हिताचे कार्य करण्याची नितांत गरज आहे.राजकीय पुढाऱ्यांनी बसवेश्र्वर महाराजांचे अनुकरण करून भ्रष्टाचार व वाजवीपेक्षा जास्त असलेली चल–अचल संपत्तीचा त्याग करून सरकारी तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे व महात्मा बसवेश्र्वरांचे आदर्श सामोरं ठेऊन समाजकार्य केले तरच खऱ्या अर्थाने राजकीय पुढाऱ्यांमार्फत बसवेश्र्वर महाराजांची जयंती साजरी झाली असे गृहीत धरले जाईल.कारण राजकीय पुढाऱ्यांजवळ समाजसेवक, लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी अशी मोठी जबाबदारीची आणि नामांकित पदे आहेत. त्याचा उपयोग समाज घडविण्यासाठी व्हायलाच हवा.बसवेश्र्वर महाराजांजवळ कोणतेही पद नसताना समाज हितासाठी अहोरात्र कार्य केले. कारण ते त्यागी, निष्ठावान,महान समाजसेवक व समाजसुधारक होते.त्यांचे अनुकरण करून आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी कार्य करण्याची नितांत गरज आहे.वैशाख शुद्ध तृतीया म्हणजे अक्षय्य तृतीया यांच दिवशी महात्मा बसवेश्र्वरांचा जन्म झाला. त्याचप्रमाणे याच दिवशी पराक्रमी भगवान परशुराम यांचाही जन्म झाला हा एक संयोगच म्हणावा लागेल.अक्षय्य तृतीया या शुभ मुहूर्ताचे औचित्य साधून,महात्मा बसवेश्र्वर आणि भगवान परशुराम यांच्या जयंतीचे शुभ संकेत लक्षात घेता या भारत भुमित आजच्या दिवशी प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावुन आगळावेगळा ऐतिहासिक उपक्रम राबवुन पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प संपूर्ण मानवजातीने करायला हवा.कारण मानवजातीच्या कल्याणासाठी आज तीन दैवी शक्ती एकत्र विराजमान आहेत. त्यामुळे तीन दैवी शक्तीचा (अक्षय्य तृतीया, बसवेश्र्वर जयंती,परशुराम जयंती) संयोग दिवस ३० एप्रिलला उजाडला आहे.यामुळे प्रत्येकांनी वृक्षारोपण करून मानवजातीचा धर्म पाळला पाहिजे.यामुळे ऑक्सिजनची मात्रा वाढेल व मानवजातीचे कल्याण होईल, गुरांना मोठ्या प्रमाणात चारा मिळेल, पशुपक्ष्यांना शुद्ध हवा व सावली मिळेल.यातच आपल्याला अक्षय्य तृतीया,महात्मा बसवेश्र्वर,भगवान परशुराम यांचे दर्शन घडुन येईल यात दुमत नाही. कारण संपूर्ण वृक्षांच्या जळा–मूळात, फळात, फुलात, पानात व झाडांच्या कणाकणात आपल्याला थोरमहात्म्यांचा, साधुसंतांचा व बसवेश्र्वर महाराजासह संपूर्ण देवी–देवतांचा वास अवश्य दिसून येईल.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वत्रंत पत्रकार )**
**मो. नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# मांजरा शुगर इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड आणि मॅपमायक्रॉप यांच्यात धोरणात्मक भागीदारी

लातूर – शेती पद्धतींमध्ये परिवर्तन घडवून आणणाऱ्या एका क्रांतिकारी उपक्रमात मांजरा शुगर इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड आणि मॅपमायक्रॉप यांनी आज एक ऐतिहासिक सामंजस्य करार केला आहे. हे दूरदर्शी सहकार्य ऊस पीक उत्पादन वाढविण्यासाठी, वैज्ञानिक पाणी संवर्धन तंत्रांचा अवलंब करण्यासाठी, मातीच्या आरोग्याची पुनर्स्थापना करण्यासाठी आणि हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या वाढत्या आव्हानांवर मात करण्यासाठी अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करणारा महाराष्ट्रातील पहिला खाजगी साखर कारखाना बनला आहे, ज्यामुळे उद्योगासाठी उत्पादकता आणि शाश्र्वतता वाढविण्याच्या दिशेने एक परिवर्तनकारी पाऊल पडले आहे.

लातूर आणि धाराशिव सारखे जिल्हे समाविष्ट असलेल्या मराठवाडा प्रदेशाने दीर्घकाळापासून पारंपारिक शेती पद्धतींचे पालन केले आहे. जे पिढ्यानपिढ्या बऱ्याच प्रमाणात अपरिवर्तित राहिले आहेत. स्थानिक शेतकरी सामान्यतः पारंपारीक पद्धतींमध्ये अनयिंत्रीत पाणी व खतांचा वापर करत असलेल्या पध्दतीमध्ये बदल करण्याच्या दृष्टीने माती आणि जमिनीचा प्रकार, घेर, सुक्रोजचे प्रमाण, फायबर टक्केवारी आणि रोग प्रतिकारशक्ती यावर आधारित उपगृहाच्या डेटाचे विश्र्लेषण करून शेतक–यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी, मांजरा ग्रुपच्या कार्यक्षेत्रात एक व्यापक पायलट प्रकल्प सुरू केला आहे, जो प्रथम धाराशिव व लातूर जिल्ह्यातील संलग्न शेतकऱ्यांवर केंद्रित असेल. हा उपक्रम शेती पद्धतींचे आधुनिकीकरण करण्याच्या दिशेने एक क्रांतिकारी पाऊल आहे.

याप्रसंगी मॅपमायक्रॉपचे श्री शिरोळे, श्री डॅा गोसावी, श्री प्रज्योत बोथरा, आदर्श नायर, यांनी पत्रकारांना माहिती देताना सांगितले की, यामध्ये ऊस वाढवण्यासाठी उपग्रह इमेजिंगमधील कौशल्य आणि एआय टूल्सचा समावेश आहे. हवामान परिस्थिती लक्षात घेऊन ऊस पिकांच्या वनस्पती निर्देशांकाचे मूल्यांकन करण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान मल्टीस्पेक्ट्रल उपग्रह डेटा वापरते. एक एआय मॉडेल या डेटावर प्रक्रिया करते आणि ९५ टक्के अचूकतेसह साखर पुनर्प्राप्ती दरांचा अंदाज लावते. अचूक कापणी नियोजन सुनिश्र्चित करण्यासाठी ही पद्धत प्रमाणित केली गेली आहे.

या परिवर्तनकारी करारांतर्गत, मॅपमायक्रॉप सहभागी शेतकऱ्यांना वैयक्तिकृत, डेटा–आधारित मार्गदर्शन प्रदान करण्यासाठी त्यांच्या अत्याधुनिक –ख–संचालित कृषी प्लॅटफॉर्मचा वापर करेल. हे डिजिटल टूल्स अनेक महत्त्वपूर्ण रिअल–टाइम विश्र्लेषण प्रदान करतील, ज्यामध्ये सर्वसमावेशक पीक आरोग्य मूल्यांकन, तपशीलवार माती पोषक द्रव्य प्रोफाइलिंग, प्रगत कीड आणि रोग शोध अल्गोरिदम, अभूतपूर्व अचूकतेसह हायपर लोकल हवामान अंदाज, आणि अनेक पर्यावरणीय बदलावर आधारित उत्पादन मॉडेलिंग यांचा पण समावेश आहे.

आम्ही हे तंत्रज्ञान केवळ शेतकऱ्यांच्या खर्चामध्ये बचत करून उत्पन्नामध्ये लक्षणीय वाढ करण्यासाठीच वापरणार नसून या अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे साखर कारखान्याची उत्पादकता वाढवण्यासाठी, रिकव्हरी, सुक्रोजचे प्रमाण, फायबर टक्केवारी तोडणी, वाहतूक नियोजनासाठी व रिअल–टाइम अपडेट्ससाठी इंटेलिजेंट डॅशबोर्ड आहे.

मॅपमायक्रॉप यापूर्वी बारामती ग्रो ट्रस्ट यांनी केलेल्या पायलट प्रकल्पामध्ये प्रती हेक्टर उत्पन्न व साखर उतारा मध्ये उल्लेखनीय परिणाम दिसून आले आहेत. हा अनुभव आणि तांत्रिक ज्ञानसंपदा आता मराठवाड्यातील पारंपारीक पद्धतीने शेती करणा–या शेतक–यांना तांत्रिक सहकार्यासाठी उपलब्ध केले आहे. पथदर्शी प्रकल्पाच्या परिणामांच्या सर्वसमावेशक मूल्यांकनानंतर व्यापक विस्तार केला जाईल.

ओडीसा व मध्यप्रदेश राज्य सरकार तसेच कर्नाटक व उत्तर प्रदेश राज्यातील कारखान्यांनी पण मॅपमायक्रॉप सोबत या प्रकराचे सामंजस्य करार केले आहेत. कारखान्याच्या सुत्रांनी सामंजस्य करार जाहीर करण्याच्या समारंभादरम्यान या उपक्रमाच्या परिवर्तनकारी क्षमतेवर भर दिला.

शेती उत्पादकता वाढविण्यासाठी आणि आमच्या शेतकरी समुदायांसाठी शाश्र्वत उपजीविका सुरक्षित करण्यासाठी विज्ञान–आधारित दृष्टिकोनाकडे संक्रमण करणे आता ऐच्छिक नाही तर अत्यावश्यक आहे. ही धोरणात्मक युती दैनंदिन शेती पद्धतींमध्ये प्रगत तंत्रज्ञानाचे निर्विघ्न एकत्रीकरण सुलभ करेल. मला पूर्णपणे खात्री आहे की ही भागीदारी आमच्या कृषी क्षेत्रात तांत्रिक क्रांतीची सुरुवात दर्शवते.

उद्योगतज्ज्ञांनी भाकीत केले आहे की, हा अग्रगण्य उपक्रम संपूर्ण मराठवाड्यात कृषी आधुनिकीकरणासाठी निर्णायक 'रोडमॅप' म्हणून काम करेल, जो संभाव्यतः महाराष्ट्र आणि त्यापलीकडील शाश्र्वत ऊस लागवडीचे भविष्य पुनर्रचित करेल.

# लातूर विमानतळ विस्तार करण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सूचना



लातूर– लातूर विमानतळ विस्तारीकरण करण्यासाठी जमीन संपादित करून लवकरात लवकर विमानतळ चालू करण्या संदर्भातील मागणी भारतीय जनता पार्टीच्या नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती .त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी हे विमानतळ लवकरात लवकर सुरू करण्यासंदर्भात संबंधितांना सूचना केलेल्या आहेत. त्यानुसार लातूरचे विमानतळ लवकरात लवकर सुरू होण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झालेल्या आहेत.

भारतीय जनता पार्टीच्या नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे लातूरच्या रखडलेले विमानतळ विस्तारीकरणासाठी लवकरात लवकर प्रयत्न करण्यासंदर्भाची मागणी केली होती. यासंदर्भात त्यांनी संबंधिताकडे वेळोवेळी पाठपुरावा केलेला होता. या पाठपुराव्याला यश मिळाले असून ,राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी संचालक मंडळाची एक बैठक नुकतीच मंत्रालयात बोलावली होती .या बैठकीमध्ये त्यांनी लातूर विमानतळ विकास करण्यासंदर्भात संबंधितांना योग्य त्या सूचना केलेल्या आहेत. लातूर विमानतळाचा विकास करावा अशी लातूरातील सामाजिक ,औद्योगिक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांची मागणी होती. या मागणीचा धागा पकडून डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी पाठपुरावा करत संबंधितांकडे पत्रव्यवहार केलेला होता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेऊन त्यांच्याकडे या संदर्भात आग्रही मागणी केली होती,आणि लातूर विमानतळ विस्तारीकरणासाठी लवकरात लवकर प्रयत्न करावेत , अशी मागणी केली होती .त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी लातूर विमानतळाच्या विकासासाठी प्रयत्न करून विकासासाठी संबंधितांना योग्य त्या सूचना केलेल्या आहेत. लातूर विमानतळाचा विकास झाला तर बीड व धाराशिव सारख्या जिल्ह्यांनाही त्याचा लाभ मिळणार आहे .त्यामुळे डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या मागणी व पाठपुराव्याला यश मिळालेले आहे.

लातूर हे शैक्षणिक हब म्हणून ओळखले जाते तसेच उद्योगाच्या दृष्टीने देखील हे शहर महत्त्वाचे शहर म्हणून ओळखले जाते परंतु येथे विमानतळ विमानतळाचे काम रखडले असल्यामुळे या विमानतळाचे विस्तारीकरण करण्याची मागणी बऱ्याच दिवसापासून प्रलंबित होती त्या मागणीला डॉक्टर अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या पाठपुराव्यामुळे यश मिळाले असून मुख्यमंत्र्यांनी केलेल्या सूचनेमुळे आता हे विमानतळ लवकरात लवकर सुरू होण्यास मदत होणार आहे.

## विचका ..

वाढदिवस शुभेच्छा
व्हॉटसॅपवरती टाका
फॉरवर्ड होईलं पोष्ट
बसे पहिला शिक्का

आगी मध्ये हळू हळू
तेलाचा मार शिडका
पाहता पाहता पहा
उडेलं जोरात भडका

कुणी टाकेल कविता
झणझणीत रे तडका
पहिलीपोस्ट कुणाची
दिवसभर मग हुडका

पोष्ट घरंगळत जाईलं
बसता जोरात धक्का
वाढदिवस नसेल तरी
हा रंग होणारं पक्का

पोष्ट मागूनि पोष्ट त्या
चालत राहीलं चक्का
खोट्यावर चालतेजग
ख-याचाएखादटक्का

कुणी तरी रे कधी तरी
आपलाही करे पचका
तयार रहायचे चेष्टेला
होईलं कधीही विचका

## बर्थ डे ..

वाढदिवस ते नेत्यांचे
बोर्ड खूप लावायचे
दिसेना शहर खराब
लवकर ना काढायचे

रोज रोज पाही बोर्ड
लक्ष जाईलं जनतेचे
प्रसिध्दी मिळे सहज
कारण नाही चिंतेचे

सरांशी आपले नाव
निमित्ताने जोडायचे
दुश्मनाचे नाव परंतु
यादी मधून खोडायचे

फोटो काढू फ्लेक्सचे
वरिष्ठांना पाठवायचे
लाळ घोटावी जराशी
हाय कमांड पटवायचे

खर्च उचलती व्यापारी
आपणां काय करायचे
तिकीट हवे रे यंदाचे
पोटा मध्येचं शिरायचे

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६.

# जिल्हा परिषद लामजना व क्रिएटिव फाउंडेशन व्दारे आयोजित विज्ञान प्रदर्शनात जागतिक विक्रम



औसा - जिल्हा परिषद लामजना व क्रिएटिव फाउंडेशन लातूर यांच्या वतीने आयोजित विज्ञान प्रदर्शनात औसा तालुक्यातील लामजना जिल्हा परिषद शाळेने विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयावर ६४२ प्रयोगांचे सादरीकरण करून जागतिक विक्रम केला आहे.एकाच दिवशी जिल्हा परिषद शाळेत ६४२ प्रयोगांचे प्रदर्शन करणारी लामजना जिल्हा परिषद शाळा देशातील एकमेव जिल्हा परिषदेची शाळा ठरली आहे.

या कार्यक्रमासाठी आमदार अभिमन्यू पवार, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, तहसीलदार घनश्याम अडसूळ, गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल शाहाणे, गटशिक्षणाधिकारी गोविंद राठोड, सरपंच महेश सगर, उपसरपंच बालाजी पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन कांबळे, उपाध्यक्ष आमरिन खजुरे, मुख्याध्यापक शिवराज माशाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.या विज्ञान प्रदर्शनात लामजना शाळेतील इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता कृषी, इंजिनिअरीग, विज्ञान, गणित आदींसह विषायावर आधारित प्रयोगांचे सादरीकरण या विज्ञान प्रदर्शनात ठेवण्यात आले होते.एकंदरीत जिल्हा परिषद शाळेच्या माध्यमातून एकाच दिवशी एवढ्या मोठ्या प्रमाणात विज्ञान प्रदर्शनाची राज्यात पहिलीच वेळ आहे.यावेळी उपस्थित मान्यवरांनी सादरीकरण करण्यात आलेल्या प्रयोगांची विद्यार्थ्यांकडून माहिती जाणून घेतली.यावेळी आमदार अभिमन्यू पवार बोलत होते कि जिल्हा परिषद शाळेत अशाप्रकारे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे हि कौतुकास्पद बाब आहे. राजमाता जिजाऊ शाळा माझी न्यारी या उपक्रमांतर्गत मुले चांगले शिकले पाहिजे त्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे जेणेकरून त्यांचे चांगले भविष्य घडावे या हेतूने मतदारसंघातील ३ शाळा प्रायोगिक तत्त्वावर विकसित करण्यात आल्या असून येणाऱ्या काळात या धर्तीवर मतदारसंघांतील इतर शाळेतही शैक्षणिक व शिक्षणेत्तर सुविधा उभारल्या जाणार आहेत.मुलांना डिजिटल ज्ञान मिळणे आवश्यक आहे हि शाळा निश्रि्चत मॉडेल शाळा म्हणून पुढे येतील लामजना जिल्हा परिषद शाळेत अत्याधुनिक कम्प्युटर लॅब, अत्याधुनिक स्मार्ट क्लासरूम, सुसज्ज विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, सुसज्ज ग्रंथालय, संगीत केंद्र, जीवन कौशल्ये प्रशिक्षण केंद्र व सौर ऊर्जा प्रकल्प आदी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. औसा विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकणाऱ्या गोरगरीब कुटुंबातील मुलांना नवोदय विद्यालये, सैनिकी शाळा व कॉन्व्हेंट शाळांप्रमाणे शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'राजमाता जिजाऊ - शाळा माझी न्यारी' या अभियानाची सुरुवात केल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.या कार्यक्रमासाठी उपस्थित इतर मान्यवरांचा सत्कार प्रशालेतील शिक्षक पांडुरंग सूर्यवंशी, गणेश वाघमारे, लक्ष्मण म्हेत्रे, अशोक गायकवाड, सुनील बिराजदार, सूर्यकांत नागलगावेश्र्वर, माधव शिंदे, श्याम फावडे यांनी केल

यावेळी आपल्या प्रास्ताविक भाषणात बोलताना शाळेचे मुख्याध्यापक शिवराज माशाळकर यांनी आमदार अभिमन्यू पवार यांनी जे शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले त्या साहित्याच्या आधारेच दोनशे पेक्षा अधिक प्रयोगांचे सादरीकरण करण्यात आले आहे.त्यानी राजमाता जिजाऊ शाळा माझी न्यारी या उपक्रमांतर्गत लामजना जिल्हा परिषद शाळेत ज्या सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.त्या आधारेच हा जागतिक विक्रम शक्य होवू शकला असल्याचे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अशोक गायकवाड व माधव शिंदे यांनी केले तर प्रास्ताविक मुख्याध्यापक शिवराज माशाळकर यांनी केले याप्रसंगी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

या कार्यक्रमादरम्यान आमदार अभिमन्यू पवार यांचा प्रशालेच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला यामध्ये आ अभिमन्यू पवारांना मानपत्र देण्यात आलं त्या मानपत्राचे वाचन श्रीमती तेजस्विनी पंडित यांनी केले जागतिक विक्रम नोंदविणाऱ्या या संस्थेमार्फत आ पवार यांचा सत्कार करण्यात आला त्याचबरोबर प्रशालीतील विज्ञान शिक्षिका श्रीमती मनीषा यांचाही सत्कार त्यांच्या वतीने करण्यात आला.

# सरपंच संघटनेचे अध्यक्ष महादेव साळुंके यांच्यासह अनेकजण आ. कराड यांच्या उपस्थितीत भाजपात

लातूर- लातूर तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष महादेव




साळुंखे यांच्यासह सलगरा, दगडवाडी बोकनगाव आणि रमजानपूर येथील माजी सरपंच, माजी चेअरमन व इतर अनेक कार्यकर्ते तसेच आजी-माजी लोकप्रतिनिधींनी लातूर ग्रामीणचे नवनिर्वाचित आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थिती भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला.

लातूर तालुक्यातील मौजे भातांगळी येथे भाजपाच्या वतीने मतदारांचे जाहीर आभार सभा घेण्यात आली यावेळी भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख अँड बळवंतराव जाधव, भाजपा किसान मोर्चाचे विक्रम काका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, पंचायतराज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथराव भोसले यांच्यासह अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी आभार सभा सायंकाळी झाली. सभेला हजारोचा जनसमुदाय उपस्थित होता.

या जाहीर सभेत भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून सलगरा येथील सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष महादेव साळुंखे, माजी सरपंच संतोष गायकवाड ग्राप सदस्य अशोक जाधव, पद्माकर गव्हाणे, शिवा भाऊ चिकटे दत्ता गव्हाणे अंबादास गायकवाड, गोवर्धन महाळ, दगडवाडी येथील ग्राप सदस्य नागोराव बदिमे, वसंतराव राठोड, बोकनगाव येथील माजी सरपंच बालाजी दाताळ, ग्राप सदस्य नामदेव चव्हाण, प्रदीप चित्ते, रमजानपूर येथील माजी सरपंच मारुती मेकले, माजी उपसरपंच शिवाजी गादे, शेख दगडू इस्माईल, मारुती जाधव, गणेश फावडे, माजी व्हाईस चेअरमन त्र्यंबक फावडे, सयाजी जाधव यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला. सर्वांना सन्मानाची वागणूक मिळेल अशी यावेळी आ. कराड यांनी ग्वाही दिली.

# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी पदाधिकारी, कार्यकर्ते नागरिकांच्या घेतल्या भेटी



लातूर (प्रतिनिधी):-राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज, सोमवार दि. २८ एप्रिल रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था, संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसह नागरिकांची भेट घेतली. त्यांनी नागरिकांच्या अडीअडचणी आणि समस्या समजून घेतल्या, तसेच त्यांच्या निवेदनांचा आणि निमंत्रणांचा स्वीकार करून संबंधितांना तात्काळ आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था लातूरच्या प्राचार्य भागीरथी गिरी, डॉ. अरविंद भातंबरे, श्याम देशमुख, जनसेवा माथाडी व श्रमिक कामगार संघटना लातूरचे संस्थापक अध्यक्ष माणिक पाडोळे, सचिन मुंडे, पांडुरंग पुट्टेवाड, फरीद हिंगे, लखन साबळे, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, राहुल देशमुख, वरवंटी बसवंतपूरचे सरपंच पवन जाधव, दुष्यंत वाघमारे, मुदखेड तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रतापराव देशमुख, संदीपराव देशमुख, महेश देशमुख, माधव हामन, भगवान पवार, लता मुद्दे, रामलिंग मुळे, सुरजकुमार मुळे, फारुक शेख आदींसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सोमवार दि. २८ एप्रिल रोजी सकाळी बाभळगाव येथे रेणापूर तालुक्यातील रेणा सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन पदी अनंतराव ठाकूर देशमुख व व्हा. चेअरमनपदी ड.प्रवीण पाटील यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# माणूस म्हणून जगण्याची लायकी नसलेल्यांनी फुले चित्रपट बघूच नये!



काल नाशिकच्या दिव्या डलॅब्समध्ये 'फुले' हा चित्रपट पाहिला.खरंतर पहिल्याच दिवशी पाहायचा निर्धार होता.पण शनिवारी क्रांतीसूर्य ज्योतिबा फुले आणि विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त नाशिकच्या कालिदास कलामंदिरात विद्यार्थ्यांसाठी मोफत लाइफ चेंजिंग सेमिनार भारतीय हितरक्षक सभा,भारत या सामाजिक संघटनेच्या वतीने घेतला होता.म्हणून रविवारी,सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांसोबत एकत्र येऊन हा सिनेमा पाहिला.

रविवार असल्याने तिकीट मिळेल का..? याची शंका होती,पण सामाजिक कार्यकर्ते कृष्णा शिंदे यांनी जवळपास ४० लोकांसाठी बुकिंग करून ठेवलं होतं. सिनेमागृहात पोहचलो,तेव्हा जवळपास १०० ते १५० प्रेक्षक हजर होते.मनात प्रचंड वेदना आणि संवेदनाशून्य होत चाललेल्या भारतीय समाजावर संताप येत होता.मध्यंतरी आलेला 'पुष्पा' सिनेमा दीड ते दोन महिने हाऊसफुल्ल चालला.त्याने भारतीय सिनेमा जगतातील पैशांचे सर्व रेकॉर्ड मोडले.पण ज्या महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी प्रत्येक भारतीय घरात शिक्षणाचा दिवा प्रज्वलित करण्यासाठी आयुष्याचा प्रत्येक श्र्वास खर्च केला,त्या महानायकाच्या जीवनावर आधारित फुले पाहायला भारतीय प्रेक्षक फारसा फिरकत नाही,हे बघून भारतीय समाजाच्या मानसिक आणि बौद्धिक गुलामीची किव करावीशी वाटली...!

पैशांचा प्रश्र्नच नाही....! फुल्यांच्या कार्याला कधीच पैशाने मोजता येणार नाही. पण (१८४८ पासून २०२५) ..१७७ वर्षं उलटूनही भारतीय समाज आजही जुनाट, कुजकट रुढी-परंपरांच्या दलदलीत रुतलेला आहे.वरवर शिक्षित झाल्यासारखं भासतं, पण खऱ्या अर्थाने माणूस म्हणून जगण्यासाठी लागणारा सुशिक्षितपणा अजूनही त्यांच्या मेंदूत जन्मलेलाच नाही.खरा सुशिक्षितपणा असता,तर 'फुले' चित्रपटाला विरोध झाला नसता,आणि भारतीय समाजाने दुर्लक्षही केलं नसतं.गेल्या ३५ वर्षांपासून मी सामाजिक क्षेत्रात काम करताना भारतीय समाजाची मानसिकता जवळून अनुभवली आहे. हजारो वर्षांची गुलामगिरी,मानसिक गुलामी,आत्मगौरवाचा अभाव आजही ठळक दिसतो.महात्मा फुल्यांनी सत्यशोधक समाज निर्माण केला तो सत्यासाठी. पण आजही भारतीय माणूस सत्याला सामोरं जायला तयार नाही.त्याला वाटतं,एखादा अवतार येईल आणि त्याचं आयुष्य बदलेल...! पुष्पा,टायगर,मर्द यांच्या अवास्तव कथा डोक्यावर घेतल्या जातात.पण त्या काल्पनिक नायकांनी तुमचं-आमचं काय भलं केलं? समाजाची परिस्थिती बदलली का? नाही...!

पुष्पा चित्रपटात काय दाखवलं? एक अडाणी,अशिक्षित माणूस स्वाभिमानासाठी गुन्हेगारी मार्ग स्वीकारतो. सत्ता-संपत्ती आणि मवाली लोकांचा कळप गोळा करतो. अशा चित्रपटांतून समाजाला काय संदेश मिळतो? गैरवर्तनाचा,बेशिस्तीचा, अपशिष्टतेचा! किती अक्कलशून्य झालाय भारतीय समाज...! समाजहिताचा गंध नसलेल्या कथांना जयजयकार,आणि ज्यांनी प्राणपणाला लावून शिक्षणाचा झरा वाहिला त्या फुल्यांचा चित्रपट बघायला नकार...! या देशात ज्या महापुरुषांनी आणि महानस्त्रियांनी समाज उद्धारासाठी आपलं आयुष्यपणाला लावलं, त्यांच्या विचारांना आजही झिडकारलं जातं. आणि ज्या पाखंडी,लुटारू,अत्याचार करणाऱ्यांनी हा समाज पिळवटला त्यांच्या नावाचा गजर आजही केला जातो...! हा आहे भारतीय समाजाचा आजचा दयनीय, लाजीरवाणा चेहरा..! जोपर्यंत खरे नायक-नायिका ओळखले जात नाहीत,तोपर्यंत हा समाज माणूस म्हणून जगण्याच्या लायकीचाच नाही!. म्हणूनच,माणूस म्हणून जगायची लायकी नसलेल्यांनी 'फुले' चित्रपट पाहू नये...! अंधारातच भरकटत जगा..भूरट्या-भारट्यांचा जयजयकार करत जगा..!

**- किरण रामी बाबुराव (मोहिते)**
**संपर्क क्रमांक -९५६१८८३५४९,नाशिक.**

# जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर जयंती महोत्सवानिमित्त जाहीर व्याख्यान आणि श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था नूतन कार्यकारणी वर्षपूर्ती निमित्त अभिष्टचिंतन सोहळा




लातूर -श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित सर्व शाखा आणि लिंगायत शरण फाउंडेशन, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर जयंती महोत्सवानिमित्त विशेष व्याख्यान आणि श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था नूतन कार्यकारणी वर्षपूर्ती निमित्त अभिष्टचिंतन सोहळा महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र आणि कामगार दिनाचे औचित्त साधून गुरुवार दि. ०१ मे २०२५ रोजी सायंकाळी ५.४५ वा. विज्ञान इमारतीसमोरील खुल्या सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे संस्थापक कुलगुरू तथा माजी खासदार प्रसिद्ध विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे हे उपस्थित राहणार असून प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ संपादक तथा सुप्रसिद्ध लेखक उत्तम कांबळे हे भारतीय ज्ञान परंपरेतील सुवर्ण पर्व : बसवक्रांती या विषयावर आपले विचार व्यक्त करणार आहेत.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य तथा इतिहास तज्ञ प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, माजी प्राचार्य तथा ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, सुप्रसिद्ध लेखक तथा बसव विचाराचे प्रचारक राजेश्र्वर जुबरे यांची उपस्थिती लाभणार असून श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे आणि सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाला श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक राजेश्र्वर बुके, संचालक बस्वराज (राजू) येरटे, संचालक काशिनाथ साखरे, संचालिका ललिताबाई पांढरे, संचालक राजेश्र्वर पाटील, संचालक बाबुराव तरगुडे, संचालक प्रभूप्पा पटणे, संचालक गुरुलिंग धाराशिवे आणि संचालक महेश हालगे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या कार्यक्रमाला महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, लातूर, एम.एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय, लातूर, श्री देशीकेंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लातूर, श्री महात्मा बसवेश्र्वर प्राथमिक विद्यामंदिर व बालक मंदिर, लातूर, श्री शंभुलिंग शिवाचार्य माध्यमिक विद्यालय, लातूर, श्री शंभुलिंग शिवाचार्य प्राथमिक विद्यालय, लातूर, श्री निळकंठेश्र्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लातूर, कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर, अल्लमप्रभू कॉलेज ऑफ फार्मसी (बी. फार्मसी), लातूर, अभियांत्रिकी महाविद्यालय, अंबाजोगाई जी बीड, कै. पूज्य टी. बी. गिरवलकर तंत्रनिकेतन महाविद्यालय, अंबाजोगाई जी बीड येथील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी सहपरिवार उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित सर्व युनिट प्रमुख आणि लिंगायत शरण फाउंडेशनच्यावतीने करण्यात आले आहे.

# श्री महालक्ष्मी कलशाच्या भव्य शोभायात्रेने वेधले लातूरकरांचे लक्ष

लातूर : लातूर शहरातील गांधी चौकातील श्री महालक्ष्मी मंदिर



कलशारोहण सोहळ्यानिमित्त सोमवारी सकाळी आयोजित करण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सोमवारी सकाळी गांधी चौकातील श्री महालक्ष्मी मंदिरापासून निघालेली हे शोभायात्रा हनुमान चौक, गंज गोलाई, भांडी गल्ली, सुभाष चौक, खडक हनुमान मार्गे परत गांधी चौकात श्री महालक्ष्मी मंदिरात आली. या शोभायात्रेत एका सजवलेल्या रथामध्ये महालक्ष्मी मंदिरावर चढविण्यात येणारा कलश ठेवण्यात आला होता. शोभायात्रेत वीरशैव लिंगायत तसेच गवळी समाजातील सुवासिनी डोक्यावर मंगल कलश घेऊन मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. शोभायात्रेत महालक्ष्मीच्या वेशभूषेतील पारंपारिक आकर्षक पौराणिक देखावेही सादर करण्यात आले होते. शहराच्या मुख्य भागातून काढण्यात आलेल्या या शोभायात्रेने लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले. या शोभायात्रेने लातुरातील वातावरण अतिशय मंगलमय झाले होते. रविवारी रात्री हभप. गुरुराज महाराज देगलूरकर यांचे सुश्राव्य किर्तनाने भाविकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. मंदिराचा कलशारोहण सोहळा मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वाजता काशी पीठाचे जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी व श्रीशैलम पीठाचे जगद्गुरु डॉ. चन्नसिद्धराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृतहस्ते संपन्न होणार आहे. यावेळी डॉ. शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज औसा, चंद्रशेखर शिवाचार्य महाराज, माजलगाव , श्री महालक्ष्मी मंदिर कलशारोहण सोहळा समितीचे स्वागताध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांसह महाराष्ट्र राज्य वीरशैव गवळी समाजाचे प्रदेशाध्यक्ष भटू बुद्धाजी नामागवळी , महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे सचिव अशोक मंडले , अशोक भाले , देवा अंजीरखाने, नारायण बहिरवाडे , सुरेश शहापूरकर , विजय लकडे, अनिल नायकू, प्रवीण हुंडीवाले, भालचंद्र हुचे, विनोद औंढेकर, सदाशिव आलमखाने यांसह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी राजकुमार झिपरे, मल्लिकार्जुन घुगरे, प्रकाश साठे, दत्ता झिपरे, माणिक आपुने, मन्मथप्पा हुचे, राम आपुने, काशिनाथ साठे, शंकर झिपरे, दिलीप झिपरे, मंगेश हुचे, अंकुश साठे, प्रकाश झिपरे, नागनाथ झिपरे, सोमनाथ कद्रे, राजू भास्कर, सिद्राम साठे संतोष साठे, शिवाजी झिपरे, लखन घुगरे यांसह गवळी समाजातील अनेक मान्यवरांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्रातील जनतेचा तसेच प्रशासनाचा 'सेवा हक्क दिन' – डॉ.किरण जाधव

महाराष्ट्र शासनाने दिनांक १ एप्रिल २०२५ रोजी '२८ एप्रिल' हा दिवस महाराष्ट्र राज्याच्या जनतेसाठी तसेच सर्व शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. १० वर्षापूर्वी म्हणजे दिनांक २८ एप्रिल २०१५ रोजी महाराष्ट्र शासनाने विशेष करुन तत्कालीन मा.मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणविस यांनी पुढाकार घेऊन महाराष्ट्रातील जनतेला नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा प्राप्त करण्याचा हक्क देणारा 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५' अंमलात आणला आहे. या अधिनियमातील कलम ४ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अशा नियत कालमर्यादेतच जनतेला लोकसेवा देण्याची जबाबदारी दिली आहे आणि त्यासाठी आवश्यक असणारे त्याचे उत्तरदायित्व निश्चित केले आहे. हा कायदा प्रशासकीय अधिकाऱ्यांना कर्तव्य भावनेतून जनतेची सेवा करण्यासाठी प्रेरीत करत आहे. या कायद्याने नव्याने निर्मित केलेल्या राज्य सेवा हक्क आयोगाने आपले ब्रीदवाक्य ''आपली सेवा आमचे कर्तव्य '' असे निर्धारित केलेले आहे.

शासनाने आयोगाच्या शिफारशी नुसार आयोगाने निर्धारीत केलेले बोधचिन्ह व ब्रीदवाक्य हे नागरीकांना दिल्या जाणाऱ्या सर्व अधिसूचित सेवांच्या प्रमाणपत्रांवर मुद्रित केले जात आहे. हे बोधचिन्ह आणि ब्रीदवाक्य शासकीय विभागांकडून त्यांच्या अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा सेवाभाव हेच कर्तव्य ही कर्मयोगाची भावना उर्धृत तर करतेच शिवाय ती त्यांनी अवलंबलेली पारदर्शकता, संवेदनशिलता व कार्यक्षम समयोचितता अशा सर्वोत्तम गुणवत्तेची ग्वाही सुध्दा देत आहे.

सेवा हक्क अधिनियमाची जडणघडण–महाराष्ट्र शासनाने सन २००५ मध्येच दफ्तर विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ अंमलात आणला. या कायद्यांतर्गत सुध्दा सर्व विभागांबाबत ते जनतेला देत असलेल्या सर्व लोकसेवांची नागरिकांची सनद त्यांच्या कार्यालयाच्या बाहेर फलकाच्या स्वरुपात दर्शनी भागात प्रदर्शित करतील असे प्राविधान आहे. या नागरीकांच्या सनदेमध्ये लोकसेवा देणा–या अधिका–यांचे पदनाम लोकसेवा देण्यासाठी विहित केलेला कमाल कालावधी तसेच अशा लोकसेवा देणाऱ्या पदनिर्देशित अधिकारी यांचेकडून विलंब झाल्यास किंवा सेवा नाकारल्यास अपील करावयाच्या अधिका–यांचे म्हणजेच प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचे पदनाम (त्याच विभागाचे गट–ब चे राजपत्रित अधिकारी) तसेच जर प्रथम अपीलामध्ये अपीलार्थिंचे समाधान झाले नाही तर द्वितीय अपीलीय प्राधिका–याचे पदनाम (त्याच विभागाचे गट–अ चे राजपत्रित अधिकारी) दर्शविण्यात यावे असे प्राविधान आहे. परंतु विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांनी स्वत: पुढाकार घेऊन या दफ्तर विलंबास प्रतिबंध अधिनियम या कायद्याचा परिणाम होत नसल्याचे लक्षात आल्यानंतर दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा कायदा अंमलात आणला.

'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५' कायद्याच्या कलम ५(२) नुसार पदनिर्देशित अधिकारी अर्ज मिळाल्यावर नियत कालमर्यादेत एकतर थेट लोकसेवा देईल किंवा ती सेवा मंजूर करील किंवा फेटाळण्याची कारणे लेखी नमूद करुन अर्ज फेटाळील. पदनिर्देशित अधिकारी, अर्जदाराला त्याच्या आदेशाविरुध्द अपील करण्याचा कालावधी आणि ज्याच्याकडे पहिले अपील दाखल करता येईल त्या प्रथम अपील प्राधिका–याचे नाव व पदनाम त्या कार्यालयीन पत्यासह लेखी कळविल अशी जबाबदारी पदनिर्देशित अधिकाऱ्यावर निश्चित केलेली आहे. तसेच कलम १० नुसार, या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये पदनिर्देशित अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कसूर केल्यास ५०० रुपयांपेक्षा कमी नसेल परंतू ५ हजार रुपयां पर्यत असू शकेल एवढ्या शास्ती चे प्राविधान आहे.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग–या कायद्याने या कायद्यातील सेवा हक्क प्राविधानांच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण करण्यासाठी एक निष्पक्ष,स्वतंत्र आयोगाची निर्मिती केली गेली. हा आयोग मुख्य आयुक्त तसेच सहा महसूल विभागांसाठी प्रत्येकी एक आयुक्त यांचा बनलेला आहे. सदर आयुक्तांची नियुक्ती ही सेवानिवृत्त असलेल्या शासन किंवा सार्वजनिक प्राधिकरण यातील प्रशासनाचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या सार्वजनिक जीवनातील प्रख्यात अशा व्यक्तींमधून केली जाते. या अधिनियमाच्या कलम १६ अनुसार या कायद्याची अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे व अधिक चांगल्या रितीने लोकसेवा देण्याची सुनिश्चिती करण्यासाठी राज्य शासनाला सूचना करणे हे आयोगाचे कर्तव्यच असल्याचे नमूद केले आहे. लोकसेवा देण्याच्या कार्यपध्दतीमुळे ज्यामुळे लोकसेवा देण्यामध्ये अधिकाधिक पारदर्शकता व सुलभता येईल असे बदल करण्याची शिफारस करणे तसेच लोकसेवा कार्यक्षमपणे देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणांनी करावयाच्या उपाययोजनांसाठी शिफारस करणे अशा सर्व उपाययोजनां द्वारे आयोगाला सार्वजनिक प्राधिकरणांच्या लोकसेवा देण्याबाबत कामगिरीचे सनियंत्रण करणे असे अधिकार दिलेले आहेत.

आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲप–महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ चे कलम २०(२) मध्ये पात्र व्यक्तींच्या अपेक्षांच्या प्रती पदनिर्देशित अधिका–यांना संवेदनशिल करणे आणि नियत कालमर्यादेत पात्र व्यक्तींना लोकसेवा देण्यासाठी माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करणे हे या कायद्याचे प्रयोजन व उद्दिष्ट असल्याचे नमूद केले आहे. याच कलमाचा अवलंब करुन महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांनी आपण देत असलेल्या जास्तीत जास्त सेवा या त्यांच्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर देण्याचे अवलंबिले आहे. अशा सर्व विभागांच्या सर्व ऑनलाईन सेवा दिनांक २८ एप्रिल, २०२५पर्यत ३३ विभागांच्या अधिसूचित करण्यात आलेल्या एकूण १०२७ सेवांपैकी ५८३ सेवा आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲपद्वारे ऑनलाईन देण्यात येत आहेत. अधिसूचित केलेल्या सेवांमध्ये नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील आवश्यक सेवा उदा.जन्ममृत्यू प्रमाणपत्र,उत्पन्न दाखला,वाहन परवाना, जात प्रमाणपत्र, मृद व जल नमुना तपासणी, बियाणे नमुना चाचणी,किटकनाशके नमुना चाचणी, जेष्ठ नागरिक प्रमाणपत्र,शेतकरी दाखला, वय राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र, अपंगत्व प्रमाणपत्र,रेशनकार्ड,ध्वनिक्षेपण परवाना, सभा–मिरवणूकांची परवानगी, विवाह नोंदणी प्रमाणपत्र,नमुना ८ अ चा उतारा देणे इ. लोकोपयोगी सेवा समाविष्ट आहेत.

सध्या प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रामार्फत त्यांच्या विभागाच्या फक्त ७ अधिसूचित सेवांसाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे. परंतु दिनांक २८ जानेवारी, २०२५ च्या शासन निर्णयाद्वारे आता या ग्रामपंचायतीतील केंद्रांना, महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांच्या ऑनलाईन सेवेचे लॉगीन क्रेडेन्शियल्स देऊन त्यांच्या मार्फत सर्व विभागांच्या सर्व ऑनलाईन सेवांना अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामुळे ग्रामिणांना हव्या असलेल्या कोणत्याही सेवेसाठी कोणत्याही विभागाच्या जिल्हास्तरीय वा तालुकास्तरीय कार्यालयात स्वत: जाऊन आपल्या अर्जाचा पाठपुरावा करण्याची आवश्यकता उरली नाही.

तसेच दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सन्मा.मंत्री महोदय यांनी घोषणा केल्याप्रमाणे १०० रुपये अतिरिक्त शुल्क भरुन नागरीकांना त्यांच्या मागणीनुसार आपले सरकार सेवा केंद्र चालकाद्वारे त्यांच्या घरी जाऊन त्यांचा अर्ज त्यांच्या समक्ष ऑनलाईन भरण्याची तसेच सेवा मंजूर झाल्यानंतर त्या सेवेचे प्रमाणपत्र मंजूरी आदेश त्यांच्या घरी वितरीत करण्याची ''सेवादूत योजना ''सुरु केली आहे.

२८ एप्रिल 'सेवा हक्क दिन' महोत्सव–शासनाच्या महसूल विभागाकडून १ ऑगस्ट हा दिवस महसूल दिन म्हणून साजरा करण्यात येतो, तसेच एप्रिल महिन्यामध्ये २१ एप्रिल रोजी नागरी सेवा दिन तर २४ एप्रिल हा राष्ट्रीय पंचायतराज दिन म्हणून साजरा केला जातो परंतु या सर्व विभागांच्या विविध दिनांचा परिपाक म्हणजे २८ एप्रिल सेवा हक्क दिवस हा आहे. हा सेवा हक्क दिन महाराष्ट्र शासनाच्या प्रत्येक कार्यालयाकडून त्यांनी या वर्षभरात जनतेला दिलेल्या सेवांचा तसेच त्यांच्या सेवा हक्कांच्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीचा वार्षीक लेखाजोखा त्यांच्या लाभार्थिना बोलावून किंवा जनतेच्या लोकप्रतिनिधींना बोलावून साजरा करायचा आहे. या दिवशी सर्व जिल्हा मुख्यालयांमध्ये सर्व जिल्हाधिकारी आपल्या जिल्हयाचे पालकमंत्री, खासदार, आमदार यांना विशेष आमंत्रित करुन तसेच सर्व जिल्हयांच्या विविध विभागांच्या अधिका–यांना बोलावून समारंभपूर्वक सर्व विभागांच्या विगत वर्षाच्या कामाचा आढावा घेतील.तसेच उपस्थित सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारीही या दिवशी त्यांच्या सेवानिष्ठेची,सचोटीची, सौजन्यतेची कटिबध्दता अधोरेखीत करणारी त्यांना नेमून दिलेली सेवा हक्क शपथ सुद्धा घेतील.

तसेच या महोत्सवी कार्यक्रमात ज्या अधिकारी कर्मचा–यांनी या अधिनियमाच्या अनुसार सचोटीने व १००म प्रकरणांमध्ये नियत कालावधीत जनतेला अधिसूचित सेवा दिल्या असतील त्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा विशेष प्रशस्तीपत्र देऊन मा. पालकमंत्री यांच्या हस्ते सन्मान करण्यात येईल. तसेच या दिवशी महाराष्ट्र शासनातर्फे मा. पालकमंत्री हे जनतेला तसेच शासकीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतील.

महाराष्ट्र शासनाने आपले सरकार सेवा पोर्टल हे पात्र व्यक्तींसाठी बहुतांश विभागांच्या कोणत्याही अधिसूचित लोकसेवेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी संयोजित व्यासपीठ आहे. हींीं:/ /रराश्रिशीरीझरी:ारहरेपश्रळपश.सीं.ळप आजवर ०१,०७,५१,००० नागरीकांनी या संकेतस्थळावर नोंदणी करुन सेवा घेतली आहे. याखेरीज आरटीएस महाराष्ट्र हे मोबाईल ॲप प्ले स्टोअर ॲपल स्टोअर वर विनामूल्य उपलब्ध आहे. अर्जदार मराठी किंवा इंग्रजी पर्याय निवडू शकतो. पात्र व्यक्ती स्वत: अर्ज करु शकत नसल्यास महाराष्ट्रातील सर्व जिल्हयामध्ये कार्यान्वित असलेल्या ३९७८३ आपले सरकार सेवा केंद्रांद्वारेही अर्ज करुन सेवा घेता येते. ही केंद्रे खासगी केंद्रचालक चालवितात व त्यांच्यावर त्यांच्या निवडीपासूनच जिल्हाधिकाऱ्यांचे नियंत्रण असते. काही विभागांची स्वतंत्र पोर्टल्स आहेत उदा. महसूल विभागाचे महाभूलेख, परिवहन विभागाचे वाहन, सारथी इ.

हा अधिनियम लागू झाल्यापासुन १७ एप्रिल, २०२५ पर्यत ऑनलाईन सेवांसाठी १८,७६,५२,११३ अर्ज प्राप्त झाले त्यांच्या निपटा–याचे प्रमाण ९४.१५म आहे. सन २०२४–२५मध्ये एकूण ०२,७७,२८,०११ सेवा अर्ज प्राप्त झाले असून निपटाऱ्याचे प्रमाण ९२.३३म आहे. अनेक अर्ज ऑफलाईन स्वरुपातही येतात. मात्र आयोगाने अनेक प्रयत्न करुन सुध्दा ऑफलाईन प्राप्त झालेल्या व निपटारा केलेल्या अर्जाची आकडेवारी संबंधित विभागांकडून उपलब्ध झालेली नाही. तथापि ही संख्या जवळपास ऑनलाईन आकडेवारीच असल्याचा अंदाज आहे.

मा.मुख्यमंत्री महोदयांनी अशा ऑफलाईन सेवा देण्याच्या प्रवृत्तींना आळा बसविण्यासाठी सर्व विभागांच्या सर्व सचिवांची विशेष बैठक घेऊन पुढील ३१ मे २०२५ पर्यत सर्व विभागांच्या सर्व सेवा या आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध करुन द्याव्यात तसे च उर्वरित ३०६ अधिसूचित सेवा ज्या सध्या ऑफलाईन आहेत त्या ऑनलाईन उपलब्ध करुन आपले सरकार या एकल पोर्टलवर संलग्न करुन १५ ऑगस्ट,२०२५ पर्यत नागरीकांना उपलबध करुन देण्याविषयी निर्देश दिलेले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या तसेच आयोगाच्या वतीने मी महाराष्ट्राच्या सर्व जनतेला सेवा हक्क दिनाच्या शुभेच्छा देत आहे.

# वेव्हज आणि भारतीय माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राची प्रगती

वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट २०२५ अर्थात वेव्हज (थअतएड २०२५) हे जागतिक स्तरावरील माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील महत्त्वाचे व्यासपीठ आहे. याची पहिली परिषद १ ते ४ मे २०२५ दरम्यान मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटर येथे आयोजित केली जात आहे. मुंबई हे भारतीय माध्यम आणि मनोरंजन उद्योग क्षेत्राचे केंद्र असल्यामुळे भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या वतीने हे आयोजन मुंबईत केले आहे.

या परिषदेत जगभरातील तज्ञ, व्यावसायिक आणि नवोन्मेषक एकत्र येत या क्षेत्रातील नवीनतम ट्रेंड, तंत्रज्ञान आणि संधींवर विचारमंथन करणार आहेत. भारतासारख्या विशाल आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी वेव्हज २०२५ अत्यंत महत्त्वपूर्ण ठरू शकते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, वेव्हजच्या माध्यमातून भारतीय व्यावसायिकांना जागतिक स्तरावरील नवीन तंत्रज्ञान आणि नवकल्पनांची माहिती मिळेल. आजकाल व्हर्च्युअल रिॲलिटी, ऑगमेंटेड रिॲलिटी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि क्लाऊड तंत्रज्ञानाचा वापर मनोरंजन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढत आहे. वेव्हजमध्ये या तंत्रज्ञानावरील अनेक चर्चासत्रे आणि प्रात्यक्षिके आयोजित केल्याने भारतीय कंपन्यांना या बदलांना आत्मसात करण्याची संधी मिळेल. यामुळे भारतीय निर्मितीची गुणवत्ता सुधारेल आणि जागतिक स्तरावर ती अधिक स्पर्धात्मक बनेल.दुसरे म्हणजे, वेव्हज हे आंतरराष्ट्रीय स्तरावर सहयोग आणि भागीदारीसाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ ठरू शकते. भारतीय निर्माते, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञांना परदेशी भागीदारांशी संपर्क साधण्याची संधी मिळेल. सहनिर्मिती आणि आंतरराष्ट्रीय प्रकल्पांमध्ये सहभागी झाल्याने भारतीय चित्रपटांना आणि कार्यक्रमांना जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळवणे सोपे जाईल.

वेव्हज च्या माध्यमातून भारतीय माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात गुंतवणुकीच्या नवीन संधी निर्माण होऊ शकतात. जागतिक स्तरावरील गुंतवणूकदार भारतीय बाजारातील क्षमता आणि वाढीची शक्यता ओळखून येथे गुंतवणूक करण्यास उत्सुक असतील. वेव्हज भारतीय प्रतिभा आणि कौशल्याला जागतिक स्तरावर सादर करण्याची संधी देईल. भारतीय कलाकार, संगीतकार, लेखक आणि तंत्रज्ञ त्यांचे काम जगाला दाखवू शकतील.

शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या दृष्टीनेही वेव्हज महत्त्वाचे आहे. या परिषदेत आयोजित केलेल्या कार्यशाळा, परिसंवाद आणि प्रशिक्षण कार्यक्रमांमधून भारतीय व्यावसायिकांना नवीन कौशल्ये शिकण्याची आणि त्यांच्या ज्ञानात भर घालण्याची संधी मिळेल. जागतिक स्तरावरील तज्ञांच्या अनुभवांचे आदानप्रदान भारतीय उद्योगातील मनुष्यबळाच्या विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल.धोरण आणि नियमनाच्या दृष्टीने विचार केल्यास, वेव्हज एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरू शकते. भारतीय नियामक संस्था आणि प्रशासनातील प्रतिनिधी जागतिक स्तरावरील सर्वोत्तम पद्धती आणि धोरणे समजू शकतील. या ज्ञानाचा उपयोग भारतीय माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या विकासासाठी अधिक प्रभावी आणि उद्योग–स्नेही नियम तयार करण्यासाठी होऊ शकतो. तसेच वेव्हज भारतीय संस्कृती आणि पर्यटन क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठीही मदत करू शकते. यामुळे, भारतीय उद्योगातील सर्व घटकांनी या जागतिक व्यासपीठाचा पुरेपूर लाभ घेणे आवश्यक आहे.

या परिषदेमध्ये माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील महत्त्वपूर्ण व्यक्ती आणि संस्था सहभागी होणार आहेत. यात प्रामुख्याने विविध देशांचे माहिती आणि प्रसारण मंत्री, नियामक संस्थांचे प्रमुख आणि सरकारी विभागाचे अधिकारी जे या क्षेत्रासाठी धोरणे आणि नियम तयार करतात. चित्रपट, दूरदर्शन, संगीत, डिजिटल मीडिया, गेमिंग, एनिमेशन, व्हीएफएक्स आणि जाहिरात कंपन्यांचे अधिकारी आणि उच्चपदस्थ अधिकारी असतील. चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, लेखक, अभिनेते, संगीतकार आणि इतर कलाकार, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणारे आणि उपाय पुरवणारे व्यावसायिक, माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेले राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार आणि वित्तीय संस्था, माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राशी संबंधित शिक्षण देणाऱ्या संस्था आणि या क्षेत्रातील नवीन ट्रेंडवर संशोधन करणारे तज्ञ तसेच माध्यम आणि मनोरंजन उद्योगातील विविध उप–क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटना आणि युनेस्कोसारख्या जागतिक स्तरावर काम करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी आहेत. याव्यतिरिक्त, वेव्हज मध्ये 'क्रिएट इन इंडिया चॅलेंज' सारख्या स्पर्धात्मक कार्यक्रमांमुळे नवोदित प्रतिभा आणि तरुण उद्योजकांना देखील त्यांचे कौशल्य दाखवण्याची संधी मिळेल.

वेव्हज मध्ये सहभागी सहभागी होण्यासाठी इच्छुक व्यक्ती आणि संस्थांना वेव्हज च्या अधिकृत वेबसाइटवर (ु. ुरींशीळपवळर.ीस) नोंदणी करावी लागेल. सहभागीदारांना त्यांच्या गरजेनुसार आणि भूमिकेनुसार विविध श्रेणींमध्ये नोंदणी करण्याची संधी मिळेल. वेव्हज हे भारतीय माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राला जागतिक स्तरावर जोडणारे एक महत्त्वाचे माध्यम ठरेल. त्यामुळे, या क्षेत्रातील प्रत्येकाने या संधीचा लाभ घेणे अपेक्षित आहे. अधिक माहिती आणि नोंदणीसाठी कृपया अधिकृत वेबसाइटला भेट द्या.

**सचिन अडसूळ, जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर**

### शासकीय जीआर संदर्भात मुख्यमंत्र्यांचा मोठा निर्णय! शेतकरी, नागरिकांना होणार मोठा फायदा

पुणे –राज्य शासन विविध विषयांवर वेळोवेळी अनेक 'जीआर' (शासन निर्णय) काढते. मात्र, कोणता जीआर सध्याच्या परिस्थितीत प्रमाणीक आहे, हेच समजेनासे झाले आहे. त्यामुळे प्रशासकीय निर्णय प्रक्रियेत मोठा गोंधळ आणि विलंब होतो आहे. या समस्या दूर करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व कालबाह्य जीआर रद्द करून एकच प्रमाण शासन निर्णय तयार केला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी प्रशासनातील अडचणींचा मुद्दा उचलून धरला. त्यांनी सांगितले की, ''राज्यात वेगवेगळ्या विभागांनी मोठ्या प्रमाणात शासन निर्णय (जीआर) काढले आहेत. नागरिक, अधिकारी किंवा कर्मचारी आपल्याला सोयीस्कर वाटणारा जीआर दाखवतात. मात्र, तो जीआर अनेकदा कालबाह्य झालेला असतो. त्यावर दुसरे नवीन जीआर आलेले असते. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत अडचणी येतात आणि कामांमध्ये विलंब होतो. सर्व जुने जीआर रद्द होणे आवश्यक आहे.''

गोरे यांनी शिक्षण आणि आरोग्य सचिवांसमोर यासंदर्भात तक्रारी सादर करताना सांगितले की, ''सचिवांना कोणी भेटत नाही, मात्र आम्ही हजारो लोकांना उत्तर द्यावे लागते. समित्या स्थापन करून वेळ वाया घालवण्याऐवजी थेट कारवाई हवी आहे.''

यावर शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी संबंधित समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी समिती स्थापन करण्याची तयारी दर्शवली. मात्र, गोरे यांनी थेट विरोध दर्शवून स्पष्ट केले, ''आम्ही समित्यांनी थकून गेलो आहोत. समित्यांचे अहवाल कधीच येत नाहीत. त्यामुळे आता नव्या समित्यांची गरज नाही. जुने जीआर सरळ रद्द करा.''

मुख्यमंत्री फडणवीस काय म्हणाले? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही यावर सकारात्मक प्रतिसाद दिला. ते म्हणाले, ''ग्रामविकास विभागातील प्रशासकीय सुधारणांसाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या सहा समित्या नेमण्यात आल्या आहेत. यापैकी एका समितीला कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने सर्व जुने व कालबाह्य शासन निर्णय रद्द करून एकच अद्ययावत आणि प्रमाणीक जीआर तयार करण्याच्या सूचना दिल्या जातील.''

फडणवीस यांच्या या घोषणेमुळे शासकीय कामकाजात गती येण्याची आणि निर्णय प्रक्रियेत सुसूत्रता निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे प्रशासनातील गोंधळ कमी होऊन, शेतकरी व नागरिकांपर्यंत शासकीय योजना अधिक प्रभावीपणे पोहोचतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## राशिभविष्य २९ एप्रिल २०२५

मेष : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व
मान सन्मान वाढणार आहे. कार्यात येणारे विघ्न दूर होतील. बाहेरच्या लोकांमुळे फायदा होईल. जोखमीचे कामे करू नका.

वृषभ : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
आपण केलेल्या कार्यामुळे स्वत:ला फायदा होईलच त्या बरोबर समाजाचा देखील फायदा होईल. जमीन, वहान, मशनरी संबंधीत चांगले योग आहेत. परिवारात वाद करू नका. ईश्वराविषयी श्रद्धा वाढेल.

मिथुन : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व
शुभ कार्याला सुरूवात करण्याचे योग आहेत. मनस्थिती चंचल होऊ देऊ नका. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. वाईट व्यसनांपासून दूर रहा. प्रवास टाळा.

कर्क : शुभ रंग:लाल, शुभ दिशा: उत्तर
मित्रांच्या सहकार्याने फायदा होईल. स्थावर प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने राहील. संत लोकांचा सहवास लाभेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

सिंह : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
महत्वाची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. एकद्या व्यक्तीच्या सहवासामुळे आपल्या जीवनात बदल घडून येईल. जीवनसाथी बरोबर प्रेमळपणे वागा.

कन्या : शुभ रंग:काळा, शुभ दिशा:दक्षिण
समाजात आपल्या कामाची स्तुती होईल. धार्मिक कामाकडील ओढा वाढेल. ओळखीचा फायदा होईल. घर, जमीन विकत घेण्याचा योग आहे. डोळ्याचा आजार संभावतो.

तुळ : शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पूर्व
अचानक यश मिळाल्याने मन प्रसन्न राही. कौटुंबिक समस्या हल होतील. आपल्या वाईट व्यसनांपासून दूर रहा.अनावश्यक खरेदी होईल.

वृश्चिक : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पूर्व
सामान्य स्तरावरचे कामे होतील. योजना सफल राहतील. समाजात यश आणि प्रतिष्ठा वाढेल. दिखाव्यापासून दूर रहा. व्यापारात, नोकरीत लाभदायक योग आहे.

धनु : शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा:दक्षिण
शुभ बातम्या कळाल्यामुळे दिवस चांगला जाईल. राजकारणापासून दूर रहा. पारिवारीक समस्या सुटतील. प्रवास सुखकारक होईल.

मकर : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर
कामामध्ये यश न मिळाल्याने निराशा येईल. कोणाच्याही मदतीची अपेक्षा करू नका. नवीन संधी मिळणार नाही. कौटुंबीक वातावरण सामन्य राहील.

कुंभ : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:उत्तर
फायदेशीर प्रेरणा मिळणार आहे. शुभ कार्यात सामील होण्याचा योग आहे. आर्थिक खर्च वाढणार आहे. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

मीन : शुभ रंग:लाल,शुभ दिशा:उत्तर
कामामध्ये यश न आल्यामुळे आपल्याला चिंता सतावेल. भाऊ, मित्र यांच्या बोलण्यामुळे मन दुखावेल. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता असून उत्पन व खर्च बरोबरीने राहील.

## इतिहासात आजचा दिवस २९ एप्रिल २०२५

अंतरराष्ट्रीय

१९९१ – बांगलादेशात चक्रीवादळात १,३८००० लोकांच्या मृत्यू झाला तर १० दशलक्ष लोक बेघर झाले.

२००६ – सौदी अरबच्या राहेली येथे एक बस खड्ड्यात कोसळल्याने २८ जण ठार झाले.

२००७ – ऑस्ट्रेलियाने सलग तिसऱ्यांदा व एकुण चौथ्यांदा विश्वचषक जिंकण्याचा पराक्रम केला. त्याने श्रीलंकेला नमविले.

२००७ – ऑस्ट्रेलियाने विश्वचषकात सलग तिसरे विजेतेपद मिळविल्यानंतर क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याची घोषणा केलेला गोलंदाज ग्लेन मॅक्ग्रा याची 'प्लेयर ऑफ द टूर्नामेंट' म्हणून निवड करण्यात आली.

२००७ – अनिवासी भारतीय उद्योगपती लक्ष्मी निवास मित्तल यांनी लागोपाठ तिसऱ्या वर्षी ब्रिटनमधील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत पहिले स्थान पटकावले.

२००७ – अमेरिकी लष्कराने इराकमधील दोन प्रांतात छापा टाकून अलकायदाशी संबंधीत काम करणाऱ्या ७२ संशयित अतिरेक्यांना अटक केली.

राष्ट्रीय

२००७ – राष्ट्रीय राजधानी दिल्लीमध्ये आयोजित एका समारंभात पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनिय योगदान दिल्याबद्दल २३ पत्रकारांना मातृश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

२००८ – मणीपुरमध्ये नगरपालिका व नगर पंचायतच्या ३३५ नगरसेवकांनी उग्रवादी संघटनांच्या आर्थिक मागणीच्या विरोधात मुख्यमंत्र्यांना आपले राजीनामे सोपवले.

२००८ – हरभजन–श्रीसंत थप्पड प्रकरणावर वक्तव्या करणाऱ्या पंच अमित साहेबा यांना २ सामन्यांसाठी निलंबित करण्यात आले.

जन्म

१९२५ – जॉन कोम्पटन, सेंट लुसीयनचे पंतप्रधान.

१९३३ – मार्क इस्केन्स, बेलजियमचे पंतप्रधान.

१९३६ – जुबीन मेहता, बॉम्बे सिमफोनी ऑकेस्ट्राचे संचालक.

२००३ – मौड भेन, नार्वेची राजकुमारी.

२००७ – इंफाँटा सोफिया, स्पेनची राजकुमारी.

निधन

१७९३ – जॉन मिचेल, इंगलश शास्त्रज्ञ.

१९९८ – हॉल लेको, कॅनाडीयन आईस हॉकीपटू व प्रशिक्षक.

२००६ – तिलकराम सहरावत, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक.

२००७ – डिक मोट्ज, न्यूझीलँडचा क्रिकेटपटू.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894